# डोळे येणे

**डोळे येणे म्हणजे काय?**

डोळे येणे किंवा डोळे गुलाबी लाल होणे हे लक्षण पापण्यांच्या आतील अस्तरांस दाह झाल्याने दिसते. हे पापण्यांच्या आतील अस्तर म्हणजे एक अतिशय तलम ऊती असून ती डोळयाच्या पुढील व पापण्याच्या मागील भागाचे आवरण असते.

**कारणे-**




- जीवाणू, विषाणू किंवा ॲलर्जी
- वनस्पतीचें पुकेसर गवत
- प्राण्यांची त्वचा आणि लाळेसारखी उत्सर्जने
- परफ्यूम
- कॉस्मेटीक
- त्वचारोगावरील औषधे
- प्रदुषित हवा
- धूर

**चिन्हे आणि लक्षणे-**

- डोळयातील श्वेत पटल लाल होणे
- डोळयात व सभोवती खाज येणे
- डोळयात काहीतरी गेल्यासारखे सतत वाटत राहणे
- डोळयातून पाणी किंवा चिकट स्राव येणे
- सकाळी उठतांना पापण्या चिकटलेल्या असणे
- डोळयाची आग होणे, जखम होणे किंवा सूज येणे
- डोळे दुखणे

**निदान-**

- डोळे तपासल्यावर समजते
- स्लीट लॅम्प मायक्रोस्कोप तपासणी

**उपचार-**

- ॲलर्जीवरील औषधांमुळे डोळंयाची खाज येणे, लाली, सूज ही लक्षणे ॲलर्जी झाली असल्यास कमी होतात.
- जीवाणू संसर्गामुळे डोळे आले असल्यास प्रतिजैविके औषधे दिली जातात. ती गोळया, आयड्रॉप्स किंवा मलम या स्वरुपात देतात.
- दाह रोधक नॉन स्टेरॉईड औषधे वेदना कमी करण्यासाठी दिली जातात.

**रुग्ण समुपदेशन-**

- स्वच्छ कापडाच्या थंड घडया डोळयांवर ठेवाव्या.
- कॉन्टॅक्ट लेन्स वापरु नये.
- त्रासदायक गोष्टी टाळाव्या
- डोळे स्वच्छ धुवावे
- हात साबणाने वरचेवर धुवावे.
- डोळे लाल असता वाचन करु नये तसेच गॉगल घातल्याशिवाय बाहेर जाऊ नये.

**डोळयातील विषाणूंचे संक्रमण थांबविण्यासाठी**

| काय करावे | काय करु नये |
|---|---|
| ✓ हात नियमित साबणाने तसेच कोमट पाण्याने धुवावे.<br>✓ चेहरा स्वच्छ करण्यासाठी वापरण्यात येणारे रुमाल, उशीचे कव्हर गरम पाणी व साबणाने धुवावे. | ✓ तुमचे डोळे ठीक होईपर्यंत कॉन्टॅक्ट लेन्सचा वापर करु नये.<br>✓ स्वतःचा टॉवेल व उशी कव्हर इतरांस वापरण्यास देऊ नये.<br>✓ डोळे चोळणे टाळावे. |

Reference: Micromedex’s Care Notes System Online 2.0